।। बहुजन हिताय । बहुजन सुखाय ।।

४१ वर्षापासून नियमितपणे प्रकाशित होणारे जनसामान्यांच्या प्रश्नांचा ध्यास असणारे एकमेव निर्भिड...

साप्ताहिक

# माणदेश वार्ता

४२

संस्थापक संपादक :
स्व.मारुती शिवाजी सोनवणे (एम.ए.)

स्थापना
६ नोव्हेंबर १९८३
RNI NO.
MAH/MAR/2004/16467
POSTAL REGD.
L2/RNP/PPR/04/2024-2026
FACEBOOK
MANDESH VARTA

सांगोला | जुने वर्ष ४२ वे नवीन वर्ष २२ वे | रविवार दि.१३ एप्रिल २०२५ | पाने ४ | मूल्य १ ₹ | अंक १६ वा

## सांगोल्याच्या महुद रस्त्या लगतच्या हॉटेल-लॉज मध्ये बिनदिक्कतपणे "सेक्स रॅकेट"


### सेक्स रॅकेटवर अनैतिक व्यापार प्रतिबंध कायद्याद्वारे कारवाई करण्याची मागणी

सांगोला :सांगोला शहराच्या महूद रस्त्या लगत असलेल्या हॉटेल वजा लॉज मध्ये पुणे-मुंबई येथील मुलींच्या माध्यमातून सेक्स रॅकेट बिनदिक्कत पणे सुरू असल्याची जोरदार चर्चा सध्या सांगोला शहर व तालुक्यात आहे. महूद रोडच्या लगत असलेल्या या हॉटेल-लॉज मध्ये गेल्या काही वर्षापासून अगदी कोरोना काळात ही मोठ्या प्रमाणात सेक्स रॅकेट चालू असल्याची कुजबूज सुरू होती. सदरील सेक्स रॅकेट हे मुंबई-पुणे येथील मुलींच्या माध्यमातून सुरू असल्याचे बोलले जात आहे. या सेक्स रॅकेट वर सांगोला पोलिसांनी अनैतिक व्यापार प्रतिबंध कायद्याद्वारे तात्काळ कार्यवाही करावी अशी मागणी

सदरचे सेक्स रॅकेट हे पूर्णत: मोबाईल वरती कार्यरत असून या सेक्स रॅकेट वरती कारवाई करण्याचे धाडस सांगोल्याचे पोलीस करणार का? अशीही चर्चा या निमित्ताने सांगोला शहर व तालुक्यात सुरू आहे.

सेक्स रॅकेट चालवण्यासाठी सदरील मुली मुंबई-पुणे येथून नियमितपणे सांगोला येथे ये- जा करीत असून सांगोला शहर व तालुका परिसरातील अनेक तरुण या सेक्स रॅकेट मुळे बरबाद झाले आहेत. अशा प्रकारच्या सेक्स रॅकेट मुळे सांगोला शहरातील व तालुक्यातील तरुण पिढी बिघडत चालली असून या सेक्स रॅकेटकडे कारवाई करण्याचे जाणून-बुजून कानाडोळा करण्याचे प्रकार पोलीस प्रशासनाच्या वतीने सुरू असल्याचे बोलले जात आहे. हे सेक्स रॅकेट चालवण्याकरिता म्होरक्या असून या म्होरक्याने सेक्स रॅकेट मोबाईलच्या माध्यमातून ग्राहकांशी थेट संवाद साधून, मुलींचे फोटो पाठवून तरुण पिढीच्या खिशाला भर दिवसा झळ लावण्याचा उद्योगधंदा जोमात सुरू असल्याने सांगोला शहर व तालुक्यातील नागरिकांतून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.



दोन दिवसा पुर्वी सांगोला शहरातील मध्यवर्ती ठिकाणावर चालणाऱ्या कॅसिनोवर धाड टाकुन कार्यवाही प्रशिक्षणार्थी पोलिस अधिक्षकांनी केलेली होती,त्याचप्रमाणे गेल्या अनेक वर्षापासून महुद रोडवर चालु असलेल्या या बाजारावर कार्यवाही करण्याची मागणी सांगोला शहरवासियांतून केली जात आहे.

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णकृती पुतळ्याचे अनावरण

### सांगोला येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकासाठी ५० लाखाच्या निधीची घोषणा



सांगोला : राज्य शासन दुष्काळग्रस्त भाग पाणीदार करण्यासाठी विविध जलसंधारणाची कामे राबवत आहे. दुष्काळग्रस्त भागाला पाणी उपलब्ध करणे व सिंचन क्षमता वाढवणे यासाठी शासन कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. सांगोला येथे आयोजित भीमसैनिकांनी उभारलेल्या निधीतून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे तसेच माजी आमदार शहाजी बापू पाटील यांच्या आमदार निधीतून साकारण्यात आलेल्या भव्य स्मारकाच्या अनावरण प्रसंगी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे मार्गदर्शन करत होते.

यावेळी ग्रामविकास व पंचायत राज मंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे, पर्यटन विकास मंत्री शंभूराजे देसाई, खासदार धैर्यशील मोहिते पाटील, आमदार बाबासाहेब देशमुख, आमदार समाधान आवताडे, आमदार राजू खरे, माजी आमदार शहाजीबापू पाटील, माजी आमदार दीपकआबा साळुंखे यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री श्री. शिंदे पुढे म्हणाले, शासनाने मंत्रिमंडळ बैठकीत म्हैसाळ उपसा सिंचन योजना व सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्यासाठी ३ हजार कोटीच्या निधीला मान्यता दिलेली आहे. ताकारी व म्हैसाळ या दोन स्वतंत्र उपसा सिंचन योजना आहेत. सांगोला तालुक्याला देखील सिंचनासाठी पाणी उपलब्ध करण्यात येणार आहे. शासन दुष्काळग्रस्त भागाला पाणीदार करून त्या भागातील सिंचन क्षमता वाढवून शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी प्रयत्नशील असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. या शासनाचे काम डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या आदर्श विचारावर चालत आहे. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला जे संविधान दिलेले आहे, त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना न्याय मिळत आहे. जिथे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पाऊल खुणा आहेत तो भाग शासनाच्या वतीने विकसित करण्यात येत असून त्यांच्या आठवणींना उजाळा देण्यात येत आहे. आपल्या राज्याची आर्थिक परिस्थिती चांगली असून मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना बंद होणार नाही,असेही त्यांनी सांगितले.

तालुक्याचे विकासासाठी भरघोस निधी देण्यात आलेला असून पुढील काळातही सांगोला तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी निधी कमी पडू दिल्या जाणार नसल्याचे त्यांनी सांगून शहाजीबापू पाटील यांच्या मागणीनुसार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकासाठी ५० लाखाचा निधी देत असल्याची घोषणा त्यांनी केली. तसेच सांगोला येथील एमआयडीसी जागा उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने प्रयत्न करण्यात येतील असेही उपमुख्यमंत्री श्री शिंदे यांनी यावेळी सांगितले. यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे म्हणाले की, डॉ. बाबासाहेबांच्या या स्मारकातून आपण बाबासाहेबांचे विचार समता, स्वातंत्र्य व बंधुता हे सर्व घटकांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न करू.

पान नंबर ३ वर

## पान नं.१ वरुन...डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णकृती पुतळ्याचे अनावरण

शासन समाजातील सर्व घटकांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्नशील असून सांगोला तालुक्याचा ही विकास करण्यात येईल असे त्यांनी सांगितले. प्रारंभी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे,पालकमंत्री जयकुमार गोरे, पर्यटन मंत्री शंभूराज देसाई या मान्यवरांच्या हस्ते सांगोला येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण करण्यात आले. त्यानंतर माजी आमदार शहाजीबापू पाटील यांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा व त्यांचे भव्य स्मारक या अनुषंगाने प्रस्ताविक केले. या कार्यक्रमास हजारो भीमसैनिक उपस्थित होते. स्वागत किशोर बनसोडे यांनी तर आभार आनंद घोंगडे यांनी मानले.विमानात बसेपर्यंत तुम्हाला ५० लाख मिळतील....आणि अर्धा तासातच मंजुरीचे पत्र सांगोल्यातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासाठी मी मुख्यमंत्री असताना दोन कोटी दिल्याचे सांगण्यात आले. पण, ते माझ्या लक्षातही नाही. उजव्या हाताने दिलेले मी डाव्या हाताला कधी कळू देत नाही, असे स्पष्ट करून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकासाठी पन्नास लाख रुपये पाहिजेत, अशी शहाजीबापूंची मागणी आहे. त्यावर शहाजीबापूंकडे पाहत उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले, काय पन्नास लाख रुपये पाहिजेत का? डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी तर आपल्याला पैसे दिलेत आणि त्यांच्यामुळेच आपण सरकार चालवतोय, त्यामुळे मी इथून विमानात बसेपर्यंत पन्नास लाखांच्या मंजुरीचे पत्र तुमच्याकडे येईल, असा शब्दही शिंदे यांनी सभेत दिला होता. आणि सभेनंतर अर्धा तासातच ५० लाख रुपये मंजुरीचे पत्र मिळाले असल्याचे माजी नगराध्यक्ष रफिकभाई नदाफ यांनी सांगितले.

### शहाजीबापूंना मोकळे सोडणार नाही-उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

सांगोल्याच्या लोकांचे प्रेम बघून एकदम ओके वाटत असल्याचे एकनाथ शिंदे म्हणाले. शहाजीबापू पडले असले तरी लोकांचे तुमच्यावर प्रेम आहे. एखाद्या मॅचमध्ये हरले म्हणून विराटची बॅट थंड पडत नाही. टायगर अभी जिंदा है. बापूंना मोकळे सोडणार नाही. बापू मोकळा ढाकळा माणूस असल्याचे एकनाथ शिंदे यावेळी म्हणाले. आम्ही उठाव केला तेव्हा सारेजण तणावात होते, पण बापू विनोद करुन वातावरण तणावमुक्त करायचे असे एकनाथ शिंदे म्हणाले. काय झाडी या डायलॉगमुळं आसामचे पर्यटन खूप वाढले आहे. आता तर बिल्डर देखील त्यांच्या जाहिरातीत बापूचा डायलॉग टाकताना दिसत आहेत. बापूंना हे माहीत नसावे नाहीतर रॉयल्टी मागितली असती असा टोलाही एकनाथ शिंदेंनी शहाजीबापूंना लगावला.

## खा.धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक उपक्रम



सांगोला : माढा लोकसभा मतदारसंघाचे लोकप्रिय खासदार धैर्यशिल मोहिते पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त सांगोला येथे विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमांतर्गत मूकबधिर निवासी शाळा सांगोला, सुंदर आश्रम शाळा राजापूर आणि प्राथमिक आश्रम शाळा मेडशिंगी येथील गरजू व गरीब ३०० विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व खाऊ वाटप करण्यात आले. याशिवाय सांगोला येथील चिंचोली रोडवरील मातोश्री वृद्धाश्रमास कुलर भेट देण्यात आला. यावेळी मोहिते पाटील समर्थक, महेश नलवडे मित्रपरिवार विद्यार्थी, शिक्षक, आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.


निर्भिड व सडेतोड बातम्या
नियमित वाचा...
साप्ताहिक माणदेश वार्ता


## नीरा उजवा कालवा विभाग, फलटण
## म्हसवड मध्यम प्रकल्प उन्हाळा हंगाम सन २०२५
## जाहीर प्रकटन क्र.३ सन २०२५

**म्हसवड** मध्यम प्रकल्पावरील सर्व लाभधारकांना कळविण्यात येते की, उन्हाळा हंगाम सन २०२५ (दि.०१/०३/२०२५ ते दि. ३०/०६/२०२५) करिता खालील प्रमाणे नियोजन करण्यात येत आहे.

१. शासनाच्या प्रचलित धोरणानुसार प्राधान्याने शक्यतो चारा पिके करावयाची आहेत.

२. या हंगामासाठी उभ्या पिकांना न.नं.७ चे पाणी अर्ज **म्हसवड तलाव शाखा महूद** या शाखा कार्यालयात दि.०४/०४/२०२५ ते दि. ३०/०४/२०२५ या कालावधीत शासकीय कामाकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत स्वीकारण्यात येतील. या मुदतीनंतर पाणी अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. तसेच पाणी मागणी अर्जासोबत प्राधान्याने ७/१२ उतारे सादर करावेत. याची कृपया नोंद घेण्यात यावी.

३. पाणी अर्ज दिला म्हणजे परवानगी मिळाली असे गृहीत धरु नये. उडाफा क्षेत्रास मंजुरी दिली जाणार नाही. आलेली एकुण मागणी व सिंचनासाठी उपलब्ध होणारे पाणी या बाबी विचारात घेउन केलेली मागणी अंशतः अगर पुर्णपणे नामंजुर करण्यात येईल.

४. म्हसवड कालव्यावर उपसा सिंचनास मंजुरी असणा-या संस्था / वैयक्तिक बागाईतदार यांनी त्यांचे नमुना नं.७ चे पाणी अर्ज स्वतंत्ररित्या शाखा कार्यालयास सादर करावेत.

५. बारमाही उपसा सिंचन योजनेचे मंजुरीधारक लाभधारकांनी नमुना नं. ७ चे पाणी अर्ज विहीत वेळेत दयावेत. इतर योजनेवर मंजुर पिकाव्यतिरिक्त पिक केल्याचे आढळुन आल्यास सदर पिकांचे पंचनामे करण्यात येउन दंडनिय दराने आकारणी करणेत येईल व मंजुरी कायमस्वरुपी रद्द करणेत येईल. उपसा सिंचनाव्दारे पाण्याचा उपसा केल्याचे आढळुन आल्यास संस्थेची / वैयक्तिक मंजुरी कायमस्वरुपी रद्द करण्यात येईल.

६. पाणी मागणी अर्ज न देणा-या बागायतदारांना पाणी मागण्याचा हक्क राहणार नाही.

७. उन्हाळा हंगामात म्हसवड कालव्यासाठी मंजूर होणा-या पाणीकोटयाच्या अधीन राहूनच पाणी पाळ्या देण्याचे नियोजन आहे.

८. लाभधारकांना आवाहन करण्यात येते की, पाण्याचा अनधिकृत वापर करु नये. अनधिकृत पाणी वापर करत असल्याचे निदर्शनास आल्यास सिंचन अधिनियम १९७६ मधील तरतुदीनुसार कडक कारवाई करणे भाग पडेल.

९. शेतकरी / पाणी वापर संस्था हे ज्या शेतचारी वापरणार आहेत त्या सुस्थितीत ठेवली असली पाहिजे.

१०. ज्या वितरिकांवरील सिंचन व्यवस्थापन पाणी वापर संस्थेकडे हस्तांतरीत झालेले आहे. अशा लाभक्षेत्रातील सिंचन पाणीपट्टीची थकबाकी संबंधित पाणी वापर संस्थांनी वसुल करुन शासनाकडे भरावी. अशा थकबाकीदार लाभधारकांना पाणी वापर संस्थेमार्फत पाणी पुरवठा करण्यात येवु नये व पाणी वापर संस्थांनी पाणी मागणी प्रत्येक लाभधारकांच्या पिकाच्या नावासह अर्जासोबत सादर करावी.

११. थकबाकीदारांचे पाणी मागणी अर्ज स्वीकारले जाणार नाही, ते मंजुरही केले जाणार नाही व त्यांना पाणीही दिले जाणार नाही. तसेच चालू हंगामाची पाणीपट्टी रोखीने भरली पाहिजे.

१२. सदर जाहीर प्रकटनानंतर पाणी मागणी अर्ज प्राप्त झालेनंतर कालवा सल्लागार समितीच्या मान्यतेने सिंचन आवर्तन सोडण्यात येईल.

१३. उपसा सिंचन क्षेत्रायसाठी पाणी परवान्याचे नुतनीकरण करुन घेतलेले असले पाहिजे अन्यथा पाणी अर्ज नामंजुर करणेत येईल.

१४. अनुज्ञेय कालावधी नंतरच्या विलंबाने केलेल्या अदायगीकरिता आकारणी केलेल्या पाणीपट्टीवर अथवा त्याच्या हिश्यावर द.सा.द.शे १० टक्के दराने विलंब शुल्क आकारणेत यावे.-

१५. महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई यांचेकडील अधिसुचना दि.१२/०७/२०१९ अन्वये ३१ आक्टोबर २०२० नंतर जलाशयावरील उपसा सिंचन योजनांना पाण्याची बचत करण्याचे तंत्र (ठिबक/ तुषारसिंचन) वापरल्याखेरीज पिकांसाठी पाणी पुरवठा करणेत येणार नाही, याची नोंद घ्यावी. याआदेशाचे पालन न करणा-यांची पाणी उपसा परवानगी रद्द करणेत येईल.

१६. महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई यांचेकडील ठोक जलदर प्रशुल्क निर्धारण आदेश दि.२९/०३/२०२२ मध्ये पाणीपट्टी सुट/सवलती/ प्रोत्साहने नमुद करणेत आलेली आहेत. सदर सवलती मिळविण्यासाठी शाखा कार्यालयाकडे संबंधितांनी वेळीच संपर्क साधावा. वरील धोरणांनुसार व शर्तीनुसार पाण्याचे पास धारण करुनच पाण्याचा वापर नियमाप्रमाणे करणे बंधनकारक राहतील.

१७. महाराष्ट्र सिंचन कायदा अधिनियम १९७६ तसेच म.स.प.शे.व्य व इतर नियमांचे अधीन राहून पाणीपुरवठा करण्यात येईल.

१८. पाणीपट्टी रक्कम नीरा उजवा कालवा विभागाच्या क्यु आर कोड वर भरावी. शाखा कार्यालय व उपविभागीय कार्यालयात क्यु आर कोड उपलब्ध आहेत.

नैसर्गिक अथवा अनैसर्गिक कारणाने पाणी पुरवठा खंडीत झाल्यास अथवा बंद करावे लागल्यास पिकाचे नुकसान झाल्यास त्याची भरपाई मिळणार नाही.

वरीलप्रमाणे करण्यात येणारा पाणी पुरवठ्यास महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम १९७६, कालवे नियम १९३४ तसेच, वेळोवेळी काढण्यात येणारे शासकीय आदेश / परिपत्रकातील सुचना लागु राहतील.

सही/-
(ध.म. कोकरे)
**उपकार्यकारी अभियंता**
**नीरा उजवा कालवा विभाग फलटण.**

जा.क्र.नीउकावि / प्रशा / ११५५ / सन २०२५
दिनांक - ०३/०४/२०२५ **स्थळ प्रत का.अ.यांना मान्य असे.**
नीरा उजवा कालवा विभाग फलटण

प्रत - मा. अधीक्षक अभियंता, पुणे पाटबंधारे मंडळ, पुणे यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी सविनय सादर.
प्रत - उपविभागीय अधिकारी, पंढरपुर पाटबंधारे उपविभाग, पंढरपूर यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी रवाना.
प्रत - शाखाधिकारी, म्हसवड तलाव शाखा महूद यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी रवाना.

जिमाका / सो/जाहि /०६/२०२५-२६

हे साप्ताहिक मालक, प्रकाशक, संपादक सोनवणे रोहित मारूती यांनी मुद्रक माळी अशोक बाळकृष्ण यांच्या बाळकृष्ण ऑफसेट प्रिंटर्स,नेहरू चौक, कोर्टा जवळ, सांगोला, जि. सोलापूर येथे छापून १२७९ अ भारत गल्ली, सांगोला, जि.सोलापूर येथे प्रसिद्ध केले. E-Mail- mandesh_varta@rediffmail.com
संपादक : सोनवणे रोहित मारूती (या अंकातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) . जुने वर्ष-४२ वे अंक-२० वा मो. ९४२०६६६५०१, ९०२८५९१४३१

# फॅबटेक कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगला स्वायत्तता दर्जा

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते सत्कार



सांगोला – सांगोला सारख्या ग्रामीण व दुष्काळी भागातील होतकरू विद्यार्थ्यांना उच्च तांत्रिक शिक्षण उपलब्ध व्हावे, या उद्देशाने फॅबटेक एज्युकेशन सोसायटीने २०११ मध्ये फॅबटेक टेक्निकल कॅम्पसची स्थापना केली. या कॅम्पसमध्ये इंजिनिअरिंग कॉलेजसह डिप्लोमा, फार्मसी डिग्री आणि सीबीएसई माध्यमाचे पब्लिक स्कूल असे विविध अभ्यासक्रम सुरू करण्यात आले आहेत. नुकतेच, विद्यापीठ अनुदान आयोग , दिल्ली यांनी फॅबटेक कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड रिसर्च, सांगोला यांना स्वायत्तता दर्जा प्रदान केला आहे. या महत्त्वपूर्ण यशाबद्दल फॅबटेक एज्युकेशन सोसायटीचे व्हॉइस प्रेसिडेंट श्री. भाऊसाहेब रूपनर आणि कॅम्पस डायरेक्टर डॉ. संजय आदाटे यांचा नुकताच सत्कार करण्यात आला. या सत्कार समारंभाला महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री मा. श्री. एकनाथजी शिंदे साहेब यांनी प्रमुख उपस्थिती दर्शविली. त्यांच्यासोबत राज्याचे मंत्री श्री. शंभूराजे देसाई, सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री श्री. जयकुमार गोरे, सांगोल्याचे आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख आणि माजी आमदार श्री. शहाजीबापू पाटील हे देखील उपस्थित होते.

मा. उपमुख्यमंत्र्यांनी फॅबटेक कॉलेजच्या या महत्त्वपूर्ण यशाबद्दल संस्थेचे अभिनंदन केले आणि संस्थेच्या शैक्षणिक कार्याची प्रशंसा केली. मंत्री श्री. शंभूराजे देसाई आणि पालकमंत्री श्री. जयकुमार गोरे यांनीही फॅबटेक कॉलेजच्या व्यवस्थापनाचे आणि प्राध्यापकांचे अभिनंदन केले. त्यांनी संस्थेने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी केलेल्या प्रयत्नांची दखल घेतली. आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख आणि माजी आमदार श्री. शहाजीबापू पाटील यांनी फॅबटेक कॉलेजच्या प्रगतीबद्दल आनंद व्यक्त केला आणि भविष्यातील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

या सत्काराबद्दल श्री. भाऊसाहेब रूपनर आणि डॉ. संजय आदाटे यांनी सर्व मान्यवरांचे आभार मानले. फॅबटेक कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या शिरपेचात या स्वायत्तता आणि सत्कारामुळे आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे, ज्यामुळे संस्थेला पुढील शैक्षणिक वाटचालीस प्रेरणा मिळाली आहे.

प्रशासकीय कौशल्याच्या आधारावर अल्पावधीतच कॅम्पसला नावारूपाला आणणारे संस्थेचे चेअरमन व विश्वस्त श्री. भाऊसाहेब रूपनर आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे याप्रसंगी विशेष कौतुक करण्यात आले.

## सांगोला तालुक्यात सीसीटीव्ही कॅमेराही असुरक्षित

# शाळेच्या प्रांगणातील सीसीटीव्ही कॅमेरे पळविले चोरट्यांनी




सांगोला : शाळेच्या प्रांगणात बसविलेले सीसीटीव्ही कॅमेरे अज्ञात चोरट्यांनी पळवून नेले असल्याची घटना बामणी ता.सांगोला येथे घडली.

याबाबत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बामणीचे मुख्याध्यापक यांनी सांगोला पोलीस स्टेशनला तक्रार अर्ज दिला आहे.दोनच महिन्यापूर्वी बसविण्यात आलेले कॅमेरे अज्ञात चोरट्यांनी पळविल्यामुळे विद्यार्थ्यांबरोबरच आता शाळेच्या सुरक्षिततेचाही प्रश्न ऐरणीवर आला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, बामणी ता.सांगोला येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बामणी शाळेच्या प्रांगणात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले होते. त्या कॅमेराच्या वायरा तोडून अज्ञात चोरट्याने ७ कॅमेरे चोरुन नेले असून त्याची चौकशी व्हावी अशी मागणी अर्जात नमूद करण्यात आली आहे.

शाळांमध्ये एकाचवेळी शेकडो विद्यार्थी असतात. अशा परिस्थितीत प्रत्येक विद्यार्थ्यांच्या सुरक्षेकडे प्रत्येकवेळी लक्ष देणे शक्य होत नाही अशा परिस्थितीत शासनाकडून जिल्हा परिषद शाळेत मुलांच्या सुरक्षिततेकरिता सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले होते. मात्र, चोरट्यांनी वायरा तोडून अज्ञात चोरट्याने ७ कॅमेरे चोरुन नेले असून सीसीटीव्ही कॅमेरेच्या चोरीच्या या प्रकारामुळे सांगोला तालुक्यात खळबळ उडाली आहे.

# सांगोला वाढेगाव रस्त्याचे डांबरीकरण त्वरित करावे, अन्यथा आंदोलन-विजयसिंह सुरवसे



सांगोला : सांगोला वाढेगाव रस्ता खूपच खराब झाल्यामुळे वाहनधारकांना मोठी कसरत करावी लागत आहे. या रस्त्याचे त्वरित डांबरीकरण करावे अन्यथा आंदोलन करावे लागेल असा इशारा सामाजिक कार्यकर्ते विजयसिंह सुरवसे यांनी दिला आहे.

सोलापूर व कोल्हापूरला जाण्यासाठी पूर्वी वाढेगाव मार्गे सर्वांना जावे लागत होते. आता राष्ट्रीय महामार्गाचा वापर होत असल्यामुळे सांगोला वाढेगाव या ७ किलोमीटर रस्त्याकडे राष्ट्रीय महामार्ग विभागाचे अक्षम्य असे दुर्लक्ष होत आहे. रस्त्यावर ठिकठिकाणी खड्डे पडल्यामुळे दुचाकी तसेच चार चाकी वाहनधारकांना मोठी कसरत करत आपली वाहने चालवावी लागत आहेत. रस्त्यावर असलेल्या खड्ड्यामुळे वाहनांचे मोठे नुकसानही होत असून वाहनधारकांना मणक्यांच्या आजाराला तोंड द्यावे लागत आहे.

यापूर्वी राज्य मार्ग विभागाकडे असलेला हा रस्ता आता राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडे आहे. याची देखभाल राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण विभागाने करायची असताना सुद्धा या रस्त्याकडे संबंधित अधिकारी जाणून बुजून दुर्लक्ष करत असल्याचा आरोप विजयसिंह सुरवसे यांनी केला आहे. लवकरात लवकर या रस्त्याचे डांबरीकरण केले नाही तर यासाठी आपण आंदोलनाची भूमिका घेणार असल्याचेही विजयसिंह सुरवसे यांनी यावेळी सांगितले.

# सांगोला तालुका पेन्शनर संघटनेच्या कार्यकारिणीची बैठक संपन्न

सांगोला : सांगोला तालुका पेन्शनर संघटनेच्या कार्यकारिणीची बैठक तालुका अध्यक्ष वसंतराव दिघे यांच्या अध्यक्षतेखाली सांगोला कार्यालयात संपन्न झाली. सदर मीटिंगमध्ये तालुक्यातील एम.एस.सी.आय.टी वेळेत न झालेल्या शिक्षकांचे केलेली कपात कोर्टाचे आदेश असताना सुद्धा अद्याप त्यांना रक्कमा प्राप्त झाल्या नाहीत त्याबद्दल सांगोला तालुक्यातील ७२ शिक्षकांची रक्कम मिळण्यासाठी जिल्हा संघटनेने बोलावलेल्या सोलापूर येथे बैठकीस हजर राहण्याचे आवाहन संघटनेचे ज्येष्ठ सल्लागार शंकर सावंत यांनी केले. तसेच संघटनेचे अध्यक्ष वसंतराव दिघे व ज्येष्ठ संचालक शंकरराव सावंत यांना आदर्श सेवा रत्न पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचा सन्मान संघटनेचे उपाध्यक्ष जयवंतराव नागणे व ज्येष्ठ संचालक विलास नलवडे यांच्या शुभहस्ते करण्यर्ची आला.

महूद ता. सांगोला येथील सेवानिवृत्त शिक्षकउ महादेव चौगुले यांचा मोबाईल हरवला व तो चोपडी सोनेवाडी येथील विद्यार्थिनी सानिका बापू बाबर हिला सापडला होता.तो तिने प्रामाणिकपणे परत केला त्याबद्दल तिचा विशेष सत्कार संघटनेचे उपाध्यक्ष जयवंतराव नागणे यांच्या शुभहस्ते व विद्यार्थिनीचे मामा अमोल केदार यांच्या उपस्थितीत करण्यात आला. यावेळी संघटनेचे सहसचिव दत्तात्रय खामकर यांनी सानिका बाबर हिच्या प्रामाणिकपणाबद्दल पुढील शैक्षणिक वर्षाच्या लागणारे लेखन साहित्य व सर्व खर्च देण्याची जबाबदारी घेतली. सदर प्रसंगी संघटनेचे संचालक एकनाथ जावीर, गंगाराम इमडे, अरुण वाघमोडे, लक्ष्मण सावंत इत्यादी उपस्थित होते. सूत्रसंचालन सहसचिव दत्तात्रय खामकर तर आभार विलास नलवडे यांनी मानले.


२४ तास ॲम्ब्युलन्स सेवा

विजय-लक्ष्मी कार्डिॲक ॲम्ब्युलन्स सर्व्हिस

AC/NON AC योग्य दरात उपलब्ध



Vijaylaxmi Cardiac Ambulance

AC/NON AC

संपर्क:- 7276070722

सांगोला शहरात ५ मिनिटात हजर


# माणगंगा नदी दुबार स्वच्छतेचा वासुद, अकोला, वाढेगाव व बलवडी येथे शुभारंभ



सांगोला : सातारा, सांगली व सोलापूर जिल्ह्यातून १६५ कि.मी. वाहणाऱ्या माणगंगेची माणगंगा भ्रमण सेवा संस्था, श्री. बृहद भारत समाजसेवा संस्था, नदीकाठची गावे व ग्रामपंचायत यांच्या संयुक्त सहयोगातून माणगंगा नदीच्या दुबार स्वच्छतेचा शुभारंभ वासूद, अकोला, वाढेगाव व बलवडी इ. ठिकाणी नुक्ताच सुरु करण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष वैजिनाथ घोंगडे, तालुका कृषी अधिकारी सौ. दिपाली जाधव, उद्योगपती सुदामजी मोरे, साहित्यिक पुरषोत्तम फुले मामा, वासुदचे सरपंच संभाजी चव्हाण, अकोल्याचे सरपंच शशिकांत गव्हाणे, माजी सरपंच किशोर शास्त्रे, चंद्रकांत सावंत, डॉ. अशोकराव शिंदे, विजय भोरे, रणजीत सावंत, कृषी विभागाचे बाळासाहेब सावंत, मनोज जाधव, बाळासाहेब केदार, राजेंद्र शिंदे, भगवान भोरे, तानाजी केदार, भगवान केदार तसेच वाढेगाव येथे सरपंच सौ. कोमल डोईफोडे, सुरेश डोईफोडे, उपसरपंच शिवाजी दिघे, माजी सरपंच नंदकुमार दिघे, डॉ. धनंजय पवार, दत्ता पाटील, ग्रामपंचायत सदस्य राहुल घोंगडे, दत्तात्रय शिनगारे, सागर ऐवळे, सौ. वसमळे, सौ. प्रतिभा भगत, दीपक दिघे, सोमनाथ वसमळे, माजी उपसरपंच अनिल दिघे, आण्णासो. गस्ते, दादासो ऐवळे, प्रदीप झोंळे, ज्ञानेश्वर तंडे, नवनाथ दिघे, अमर माने, गुंडा साळुंखे, आप्पा कोळी, नितीन गेजगे इ. सह अनेक ग्रामस्थ व नागरिक उपस्थित होते.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष वैजनाथ घोंगडे यांनी माहिती देताना सांगितले की, चार वर्षापूर्वी लोकसहभागातून ७५ कि.मी. माण नदीपात्र व १८ बंधारे स्वच्छ केले होते. चिलार बाभळीमुळे पाण्याचा मोठ्या प्रमाणात अपव्यय होतो. आत्तापर्यंत लोकसहभागातून अडीच कोटीहून अधिक खर्च केला आहे. ही नदीची स्वच्छता नाही टिकवली तर नदीची आणखी दुरावस्था होईल, म्हणून दुबार स्वच्छता हाती घेतल्याचे त्यांनी सांगितले. तर याप्रसंगी तालुका कृषी अधिकारी सौ. दिपाली जाधव मॅडम यांनी शासकीय योजनेतून नद्या व ओढे यासंबंधी ज्या योजना राबवता येतील त्या राबवून तालुक्यातील नद्या अधिक स्वच्छ कशा राहतील याबाबत कृषी कार्यालय लक्ष देईल.

याप्रसंगी सुदाम भोरे, डॉ. धनंजय पवार, दीपक दिघे इत्यादींनी आपले विचार व्यक्त करून नदी स्वच्छतेच्या कामामध्ये सहकार्य करण्याचे मान्य केले. शेवटी ग्रामपंचायत सदस्य राहुल घोंगडे यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले.


भावपूर्ण श्रध्दांजली

तेरावे पुण्यस्मरण



कै.कमळाबाई शिवाजी सोनवणे

मृत्यू दिनांक:११ एप्रिल २०१२

-:आपलेच:-

✻ विश्वजित भागवत सोनवणे ✻ ॲड. श्री. रोहित मारूती सोनवणे ✻

✻ अमरजित भागवत सोनवणे ✻

सोनवणे,खंदारे,पोळ,कटके,बोराडे,शिंदे,चौधरी परिवार